NAGPURSTUDY.COM

**KNT/KW/16/5072/5246/5296**

**Bachelor of Science (B.Sc.)/B.C.A./B.Sc.(I.T.) Semester—II (C.B.S.) Examination**

**MARATHI**

**Paper—II**

Time : Three Hours] [Maximum Marks : 60

**सूचना** :—(1) सुवाच्य अक्षरे, मुद्देसूद उत्तरे व शुद्धलेखन अपेक्षित.

(2) सर्व प्रश्न अनिवार्य.

1. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा (**200** शब्दात) : 12

(1) विज्ञान आणि पर्यावरण

(2) मी अभिनेता झालो तर !

2. खालील प्रश्नाचे उत्तर लिहा (**200** शब्दात) : 12

'सत्य कुणीही शोधू शकते' असे श्याम मनोहर का म्हणतात ?

**किंवा**

स्त्री-पुरुष समानतेविषयी अरुणा सबाने यांना काय वाटते ?

3. खालील प्रश्नाचे उत्तर लिहा : 12

'गाव जुने शेणमातीचे' या कवितेतील ग्रामीण जाणीव स्पष्ट करा.

**किंवा**

'जन्म-मरणाच्या वेणा' या काव्याचे रसग्रहण करा.

4. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(अ) संतांनी देवत्व कोणास बहाल केले ? 3

**किंवा**

साक्षरता अभियानाचे वर्णन रमेश इंगळे उत्रादकर यांनी कसे केले आहे ?

(ब) जागतिकीकरणाच्या भवितव्याचे चित्रण कवीने कसे केले आहे ? 3

**किंवा**

कवीने सांगितलेले शब्दांचे सामर्थ्य सविस्तर स्पष्ट करा.

(क) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा : 3

(1) कानाडोला करणे

(2) जीव भांड्यात पडणे

(3) पोटावर पाय देणे.



rtmnuonline.com

NagpurStudy.com

(ड) खालील शब्द शुद्ध करून लिहा : 3

(1) सुचना

(2) शरीरीक

(3) माहीति

(4) सहस्त्रावधि

(5) क्रिडाप्रेमि

(6) वागमय.

5. (अ) खालील उताऱ्याचा सारांश तुमच्या शब्दात लिहा : 4

तुकोबांचे दर्शन ही काही सोपी बाब नव्हे. तुका म्हणे नव्हे दिसतो मी तैसा असे म्हणून स्वत: तुकोबांनीच आपल्या दर्शनेच्छूंची पंचाईत करून ठेवली आहे, ती परत वेगळीच. तुकोबांचे पूर्ण दर्शन घडविण्यास मी पात्र आहे, असा माझा दावा नाही मला तुकोबा जसे दिसले तसे दाखविण्याचा मी प्रयत्न करणार आहे. तुकोबांचे व माझे नाते अनेक स्तरांवरील आहे. त्यांचा दहाव्या पिढीतील वंशज या नात्याने मी त्यांच्याशी रक्तसंबंधाने संबद्ध आहे. पिढीजात वारकरी म्हणून त्यांचा-माझा सांप्रदायिक संबंध आहेच ; पण मराठी संस्कृतीचा व संतसाहित्याचा अभ्यासक या नात्यानेही मी तुकोबांशी निगडित आहे. आमचे नाते हे तोडायचे म्हटले तरी तुटणार नाही, इतके घट्ट आहे.

(ब) साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याबद्दल तुमच्या मित्राला अभिनंदनपर पत्र लिहा. 4

(क) शिक्षणाचा अधिकार म्हणजे काय ? ते थोडक्यात स्पष्ट करा. 4



rtmnuonline.com